# ‘मर्जी’ हॉटलाईन

सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी

**९०७५ ७६४ ७६३**



सम्यक

संवाद व संसाधन केंद्र, पुणे

# ‘मर्जी’ हॉटलाईन

सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी

**१०७५ ७६४ ७६३**

१०७५ ७६४ ७६३

मर्जी
हॉटलाईन

सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी
सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत

## ‘मर्जी’ हॉटलाईन
**सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी ९०७५ ७६४ ७६३**

प्रकाशन वर्ष : २०१५

**प्रकाशक:**

**‘सम्यक’**
संवाद आणि संसाधन केंद्र,
बी ३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड, पुणे-४११०५१

**लेखन:**

प्रितम पोतदार

**विशेष आभार:**

मिलिंद चव्हाण
डॉ. सुचित्रा दळवी, समन्वयक, एशिया सेफ अबॉर्शन पार्टनरशिप
डॉ. गोरख मन्द्रुपकर, सदस्य, एशिया सेफ अबॉर्शन पार्टनरशिप
आणि वैद्यकीय सल्लागार, ‘मर्जी’ अबॉर्शन हॉटलाईन.

**मुखपृष्ठ आणि चित्रे:**
चंद्रशेखर जोशी

**मांडणी व छपाई :**
संस्कृती डिझायनर्स ॲण्ड प्रिन्टर्स

या पुस्तिकेतील माहितीचा वापर पुस्तिकेचा संदर्भ देऊन खुलेपणाने करावा.

**खाजगी वितरणासाठी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भूमिका | ०४ |
| २. | तुम्हाला हे माहिती आहे का? | ०६ |
| ३. | सुरक्षित गर्भपात म्हणजे काय? | ०८ |
| ४. | गर्भपाताचा कायदा काय म्हणतो? | १० |
| ५. | 'मर्जी' हॉटलाईन बद्दल | ११ |

# भूमिका

भारतामध्ये १९७१ साली गर्भपाताला मान्यता देणारा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याअंतर्गत ठरावीक परिस्थितींमध्ये महिलेला गर्भपात करून घेता येतो. परंतु हा कायदा अस्तित्वात असूनही अनेक महिलांना याबद्दल माहिती नाही असे अनेक अभ्यासांमध्ये सिद्ध झाले आहे आणि फक्त माहितीअभावी अनेक महिला सरकारमान्य गर्भपात केंद्रांमध्ये जात नाहीत, असेही दिसून आलेले आहे. याव्यतिरिक्त गर्भपाताशी संबंधित अनेक समस्या आपल्या समाजात आहेतच. जसे की, गर्भपात म्हणजे 'हत्या करणे' असे समजले जाते, गर्भपात करणाऱ्या स्त्रीबद्दल अनेकदा शंका उपस्थित केल्या जातात, स्त्रिया गर्भपाताबद्दल उघडपणे बोलू शकत नाहीत इ. आणि अशा परिस्थितीमुळे गर्भपाताबद्दल आणि त्यासंबंधी प्रक्रियेबद्दल अनेक गैरसमज समाजामध्ये पसरलेले आहेत व त्यांना कोणताही शास्त्रीय आधार नाही. शिवाय, लग्न कधी होणार, कुटुंब नियोजनाचे साधन वापरायचे की नाही, मुलं कधी होणार, होणार की नाही, किती मुलं होणार, कधी थांबायचे, यासंदर्भातील कोणतेच निर्णय घेण्याची मुभा स्त्रियांना नसते. यासंदर्भातील सर्व निर्णय तिच्यावतीने तिच्या सासरचे लोक किंवा तिचा नवरा घेत असतो. यामुळे अनेक महिलांना नको असताना मुलांना जन्म द्यावा लागतो किंवा गर्भपातही करावा लागतो. खरंतर, स्त्रीचा तिच्या शरीरावर संपूर्ण अधिकार असायला हवा. तिच्या लैंगिकता आणि प्रजजनासंदर्भातील सर्व निर्णय घेता येणे हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार आहे. परंतु तो डावलला जातो. या सगळ्या परिस्थितीच्या मुळाशी पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक व्यवस्था आहे.

'सम्यक' मार्फत आम्ही मागील दोन वर्षांपासून महाराष्ट्रात 'सुरक्षित गर्भपात' या मुद्द्याच्या समर्थनार्थ एक अभियान राबविण्यासाठीची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेअंतर्गत विविध गटांतील महिलांबरोबर या संबंधी चर्चा केली गेली. त्यातून लक्षात आले की, सुरक्षित गर्भपात म्हणजे काय? त्यासाठी कुठे जावे लागेल? गर्भपाताच्या सेवा कुठे उपलब्ध असतात? गर्भपात कसा करतात? गरोदर राहूच नये म्हणून काय-काय करता येईल अशा अनेक प्रश्नांसंबंधी महिलांना माहिती हवी असते. याशिवाय गरोदरपणात अचानकपणे काही अडचण आली तर काय करायचे? कोठे जायचे? अशी परिस्थितीही समोर उभी रहाते.

याबाबत महिलांना माहिती मिळावी म्हणून 'मर्जी हॉटलाईन' सुरू करत आहोत. या हॉटलाईनवरून गर्भनिरोधक साधने आणि गर्भपात यासंबंधीची माहिती

महिलांना दिली जाईल. सुरुवातीला पुणे आणि सांगली जिल्ह्यांमध्ये ही हॉटलाईन काम करेल आणि नंतर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील १० जिल्ह्यांमध्ये ती विस्तारित केली जाईल. या हॉटलाईनच्या माध्यमातून अनेक महिलांना त्यांच्या प्रजजन आरोग्याशी संबंधित संवेदनशील मुद्द्यांवरती खुलेपणाने बोलता येईल आणि त्यासंबंधीचे निर्णय घेण्यासाठी आश्वासक सहकार्य आणि आधार मिळेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

गर्भपात, कुटुंबनियोजनाची साधने, गर्भपाताचा कायदा आणि मर्जी हॉटलाइन संदर्भातील काही मूलभूत माहिती या पुस्तिकेत नमूद केलेली आहे. स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते, महिला आरोग्याच्या मुद्द्यावर काम करणाऱ्या संस्था-संघटना व व्यक्ती, आशा, ए.एन.एम, अंगणवाडी कार्यकर्त्या, नर्स आणि लिहिता वाचता येणाऱ्या महिला व पुरुष या सर्वांना या पुस्तिकेतील माहितीचा उपयोग होऊ शकेल.

- आनंद पवार
सम्यक, पुणे



* भारतामध्ये दरवर्षी सत्तर लाख गर्भपात होतात (पॉप्युलेशन कौन्सिल, २०१३) त्यापैकी अंदाजे ५०% हे बेकायदेशीर व असुरक्षित असतात. भारतातील एकूण मातामृत्यूंच्या संख्येपैकी असुरक्षित गर्भपातामुळे जवळ जवळ ८% महिला मृत्युमुखी पडतात. याव्यतिरिक्त भारतात अनेक महिला आजारप्रवण परिस्थितीत जगत असतात. प्राथमिकदृष्ट्या ही परिस्थिती इतकी गंभीर आहे असे वाटणार नाही परंतु सुरक्षित गर्भपाताचा कायदा अस्तित्वात असूनही आज आपल्याकडे अनेक महिलांना त्यांचा प्राण गमवावा लागतो किंवा आयुष्यभरासाठीचे गंभीर दुखणे घेऊन जगावे लागते. अनेक मातामृत्यू सरकारी यंत्रणेकडे नोंदवले जात नाहीत. त्यामुळे वर दिलेला आकडा मोठा असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

* सुरक्षित गर्भपात सुविधा मिळणे हा प्रत्येक स्त्रीचा हक्क आहे आणि असुरक्षित गर्भपात व मातामृत्यू हा महत्त्वाचा आणि गंभीर मुद्दा आहे. त्यामुळे त्याची दखल सरकारने खूप गांभीर्याने घ्यायला हवी.

* वैद्यकीय गर्भपाताच्या कायद्यानुसार सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये गर्भपाताची सेवा पुरविण्यास मान्यता आहे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय येथे गर्भपाताची सेवा उपलब्ध असणे अपेक्षित आहे. यासाठी सरकारी रुग्णालयांनी वेगळी परवानगी घेणे अपेक्षित नाही. आपण आपल्या जवळच्या सरकारी रुग्णालयात ही सेवा मिळते की नाही याबद्दल जागरूक असायला हवे.

* वैद्यकीय गर्भपाताच्या कायद्यानुसार जर महिलेने तिच्या वयाची १८ वर्षे पूर्ण केली असतील तर तिच्या एकटीच्या मान्यतेने/सहीने तिचा गर्भपात होऊ शकतो. यासाठी तिच्या घरच्यांच्या किंवा नवऱ्याच्या सहीची गरज नसते. गर्भपात करत असताना स्त्री विवाहित आहे किंवा अविवाहीत हा मुद्दा येथ गौण आहे. गरज असलेल्या प्रत्येक स्त्रीला गर्भपाताची सेवा मिळावयास हवी.

* गर्भपाताच्या गोळ्या खाऊन किंवा शस्त्रक्रिया करुन गर्भपात करता येतो. अद्ययावत तंत्रज्ञानामुळे गर्भपात बिनधोकपणे करता येतो. गर्भपात जर सुरक्षित पद्धतीने केला असेल तर भविष्यकालीन धोके उद्‌भवण्याचे

प्रमाण अत्यल्प आहे.

* सुरक्षित गर्भपात हा अनियोजित आणि नको असलेले गरोदरपण टाळण्यासाठी महत्वाचा पर्याय असला तरी गर्भपात करण्याची वेळच येऊ न देणे ही देखील महत्त्वाची बाब आहे. यासाठी कुटुंब नियोजनाची विविध साधने उपलब्ध असतात. या साधनांच्या वापराने नको असलेले गरोदरपण टाळता येते. याव्यतिरिक्त निरोध/कंडोम या गर्भनिरोधक साधनाच्या वापराने प्रजनन मार्गातील संसर्ग किंवा आजारही टाळता येऊ शकतात. गर्भ राहू नये यासाठी पुरुषांनीही गर्भनिरोधके वापरली पाहिजेत. पुरुषांनी गर्भनिरोधके वापरणे व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे तुलनेने जास्त सोपे व सोईस्कर आहे. आत्ता आपल्याकडे उपलब्ध असलेल्या गर्भनिरोधक साधनांची यशस्विता जवळ जवळ ९९% पर्यंत आहे. परंतु या साधनांचा वापर टाळला जातो. जवळील वैद्यकीय तज्ज्ञ किंवा नर्स यांचा सल्ला घेऊन आपणास योग्य त्या साधनाचा वापर करणे हे त्या महिलेच्या व परिणामी कुटुंबाच्या आरोग्याकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे.

**गर्भनिरोधक साधनांची नावे:**

**स्त्रियांसाठी:** तांबी, इंजेक्शन, गर्भनिरोधक गोळ्या, गर्भाशय कुपी, कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया

**पुरुषांसाठी:** कंडोम/निरोध आणि कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया




वैद्यकीय कृत डॉक्टरांनी

***

योग्य त्या पद्धती वापरून नोंदणीकृत ठिकाणी, जंतुसंसर्ग किंवा इतर कोणतेही आजार होणार नाहीत अशा वातावरणात केलेला गर्भपात म्हणजे सुरक्षित गर्भपात होय.

सुरक्षित गर्भपात कसा करावा यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने काही मार्गदर्शक तत्त्वांची पुस्तिका तयार केली आहे. त्यानुसार गर्भपाताच्या गोळ्या वापरुन केलेला गर्भपात हा प्रथम त्रैमासिक गर्भपातांसाठी जास्त सोईस्कर आणि सुरक्षित असू शकतो. भारतामध्ये गर्भपात करण्यास पात्र असणाऱ्या डॉक्टरांना या गोळ्या त्यांच्या हॉस्पिटलमध्ये ठेवण्याची किंवा लिहून देण्याची परवानगी आहे. या शिवाय शस्त्रक्रिया करूनही गर्भपात करता येऊ शकतो. यासाठी सरकारी आणि सरकारमान्य खाजगी गर्भपात केंद्रात स्त्रीला जावे लागते.

गोळ्या खाऊन केलेला गर्भपात आणि शस्त्रक्रियेने केलेला गर्भपात यांचे फायदे आणि तोटे पुढील तक्त्यात नमूद केलेले आहेत.

## गर्भपाताचा कायदा काय म्हणतो?

भारतामध्ये १९७१ साली वैद्यकीय गर्भपाताचा कायदा आला व त्यामध्ये




**सरकारी दवाखाना**




**खाजगी दवाखाना**

**गर्भपाताच्या पद्धती व त्याचे फायदे - तोटे :**

| गर्भपाताचे प्रकार | फायदे | तोटे |
|---|---|---|
| **गोळ्या वापरुन केलेला गर्भपात** | - गरोदर असताना पहिल्या २ महिन्यांआधी उपयुक्त.<br>- नैसर्गिक गर्भपातासारखी प्रक्रिया होते.<br>- भूल देण्याची गरज नसते.<br>- स्वत: महिलेशिवाय इतर कोणाच्याही देखरेखीची गरज नसते.<br>- लवकरात लवकर या पद्धतीने गर्भपात केल्यास जास्त फायदेशीर आणि यशस्वितेची खात्री देता येते. | - जास्त रक्तस्त्राव होत असल्यास त्वरित उपचारांची गरज लागते, पण ही शक्यता ५% एवढीच असते. |
| **शस्त्रक्रियेने केलेला गर्भपात** | - एका भेटीत गर्भपाताची प्रक्रिया पूर्ण होते.<br>- बधिर होण्याचे इंजेक्शन देऊन व गरज लागल्यास भूल देऊन गर्भपात करता येतो. | - उपकरणांच्या साहाय्याने गर्भपात केला जातो<br>- गर्भधारणा झाल्यानंतर लगेचच या पद्धतीने गर्भपात करणे अवघड असते<br>- सुविधांची गुणात्मकता वेगवेगळी असू शकते. |

२००३ साली सुधारणा करण्यात आली. कायद्यानुसार आपल्याकडे ५ अटींअंतर्गत २० आठवड्यांपर्यंत केलेला गर्भपात कायदेशीर मानला जातो

**कायदेशीर गर्भपात करण्यासाठीच्या अटी पुढीलप्रमाणे:**

- ✻ गर्भवती स्त्रीचा जीव वाचविण्यासाठी
- ✻ जर गर्भधारणेचा स्त्रीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होणार असेल तर
- ✻ जर गर्भ शारिरिक किंवा मानसिक विकलांग असेल तर
- ✻ जर बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असेल तर आणि
- ✻ जर विवाहित स्त्री बाबतीत ही गर्भधारणा गर्भनिरोधक साधनांच्या अयशस्वितेमुळे किंवा अयशस्वी वापरामुळे झाली असेल तर

- सरकारी किंवा सरकारमान्य खाजगी गर्भपात केंद्रांमध्ये नोंदणीकृत वैद्यकीय तज्ज्ञांनी केलेला गर्भपात कायदेशीर मानला जातो.
- वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार सर्व सरकारी आरोग्य सेवांना गर्भपात करण्यासाठी कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त वैद्यकीय गर्भपाताच्या कायद्यानुसार स्त्री-रोग तज्ज्ञ आणि एम.बी.बी.एस. पदवी घेतलेल्या खाजगी डॉक्टरांनाही सुरक्षित गर्भपातासाठी कायदेशीर मान्यता मिळू शकते.
- जर १२ आठवड्यांपर्यंत गर्भपात करायचा असेल तर एका डॉक्टरच्या मताची तर १२ आठवड्यांच्या पुढील गर्भपातासाठी २ डॉक्टरांच्या मताची आवश्यकता असते.
- जिचा गर्भपात करायचा आहे ती स्त्री जर १८ वर्षांपेक्षा कमी वयाची असेल तर गर्भपातासाठी तिच्या पालकांच्या संमतीची आवश्यकता असते. जर तिने वयाची १८ वर्षे पूर्ण केली असतील तर केवळ गरोदर महिलेच्या संमतीने गर्भपात होऊ शकतो.

भारतात अजूनही गर्भपात हा स्त्रियांचा हक्क म्हणून अस्तित्वात आलेला नाही. तो ठरावीक अटींखालीच कायदेशीर मानला जातो.

✻✻✻

# ‘मर्जी’ हॉटलाइन बद्दल

आपल्याकडे आजही अनेक महिलांना सुरक्षित गर्भपात कोठे करायचा, तो कसा होतो, गर्भधारणा होऊन नये म्हणून काय करायचे, याबद्दल माहिती नसते किंवा त्यांना मिळालेली माहिती योग्य असेलच असेही सांगता येत नाही. माहितीअभावी अनेक महिला गरोदरपण नको असेल तर असुरक्षित गर्भपाताच्या मार्गांचा अवलंब करतात. याचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. काही वेळेला हे प्रयत्न जीवावरही बेतू शकतात.

म्हणूनच महिलांना गर्भनिरोधक साधने आणि गर्भपातासंबंधी असणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी ‘मर्जी’ हॉटलाईन सुरू करत आहोत. सुरुवातीला ती पुणे आणि सांगली जिल्ह्यांमध्ये चालवली जाईल व नंतर पश्चिम महाराष्ट्र अणि मराठवाड्यातील १० जिल्ह्यांमध्ये सुरू केली जाईल. ‘मर्जी’ हॉटलाईन मार्फत पुढील विषयांवर माहिती दिली जाईल:

- गर्भनिरोधके: गर्भनिरोधकांचे प्रकार, कुठे मिळतात, कशी वापरायची इ.
- गर्भपाताबद्दल तांत्रिक महिती
- गर्भपाताच्या कायद्याबद्दल माहिती
- गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या सरकारमान्य व खाजगी गर्भपात केंद्रांबद्दल माहिती
- गरज पडल्यास सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या सरकारी किंवा खाजगी सेवांकडे गर्भपात मिळण्यासाठी संदर्भसेवा

ज्यांना गरज आहे अशा कोणीही महिला **सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते सायंकाळी ६** या वेळामध्ये फोन करू शकतात.

जर संध्याकाळी सहा नंतर किंवा शनिवार-रविवार या दिवशी फोन केला व उचलला गेला नाही तरी दुसऱ्या दिवशी सकाळी मर्जी हॉटलाईन मार्फत आम्ही तुम्हाला फोन करू.

या नंबरवर फोन करणाऱ्या व्यक्तीचे नाव व इतर संपर्काबद्दलची माहिती याबद्दल संपूर्ण गुप्तता राखली जाईल.

पुरुषही या हॉटलाईनवर फोन करू शकतात. त्यांना तांत्रिक माहिती मर्जी हॉटलाईन मार्फत दिली जाईल परंतु प्रत्यक्ष मदतीची गरज असेल तर यासंदर्भातील सर्व माहिती फक्त गरोदर महिलेलाच दिली जाईल.

मर्जी हॉटलाईनमार्फत मराठी आणि हिंदी भाषेत फोन करणाऱ्या व्यक्तीबरोबर संवाद साधला जाईल.

**तुम्ही पुढील नंबरवर आमच्याशी संपर्क साधू शकता:**

**९०७५ ७६४ ७६३**



## सम्यक – संवाद व संसाधन केंद्र

या संस्थेचे पुण्यात कार्यालय आहे. आरोग्य आणि विकासाच्या कार्यक्रमांमध्ये स्त्री–पुरुष समानतेचे मुद्दे समाविष्ट करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, साधन–साहित्य तयार करणे व अभियान राबविण्याचे काम 'सम्यक' प्रामुख्याने करते. महाराष्ट्रासहीत भारतातील इतर राज्यांमध्ये आणि दक्षिण आशियायी देशांमध्येही 'सम्यक' कार्यरत आहे.

स्त्रियांचे लैंगिक व प्रजनन हक्क हा सम्यकच्या कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आरोग्य सुधारावे, स्त्रियांना स्वतःच्या शरीराविषयी निर्णय घेता यावेत व त्याकरिता बिनधोक व संवेदनशील आरोग्यसेवा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने संस्था महिला आरोग्याच्या मुद्द्यावर मागील अर्ध्या दशकाहून अधिक काळ प्रयत्न करते आहे. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागांमध्ये लिंग निदानाला विरोध करित असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवामात्र मिळाल्या पाहिजेत या मुद्द्यांवर एक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याअंतर्गत गर्भ–लिंग निदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात यामागणीसाठी 'सम्यक' मार्फत शासन, स्वयंसेवी संस्था व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना एकत्र आणण्याचा व स्त्रियांसाठी सुरक्षित गर्भपाताच्या सेवा सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.


**सम्यक – संवाद व संसाधन केंद्र**

बी ३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे–४११०५१

मो. +९१ - ९४०३५ १६२३७

ईमेल : samyak.pune@gmail.com • anandpawar@gmail.com

वेबसाईट : www.samyakindia.org